अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १६ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

अश्विन गोलंदाजीत तर जडेजा अष्टपैलूमध्ये पहिल्या स्थानावर

मुंबई : बॉर्डर गावस्कर कसोटी मालिकेवर भारताने २-१ ने कब्जा केला. त्यानंतर आयसीसीने कसोटी क्रमवारी जारी केली आहे. विराट कोहलीने फलंदाजीत मोठी झेप घेतली आहे. कसोटीत आठ क्रमांकाची झेप घेत विराट कोहली १३ व्या क्रमांकावर पोहचला आहे.

बॉर्डर गावस्कर कसोटी मालिकेत विराट कोहली सर्वाधिक धावा करणारा दुसरा फलंदाज होता. अखेरच्या कसोटी सामन्यात विराट कोहलीने ३६४ चेंडूत

१५ चौकारांच्या मदतीने १८६ धावांची खेळी केली होती. यामुळे विराट कोहलीने आठ क्रमांकाची झेप घेत १३ व्या स्थान गाठलेय. १८६ धावांच्या दमदार खेळीमुळे विराट कोहलीला ५४ रेटिंगचा फायदा झाला आहे. विराट कोहलीशिवाय कर्णधार रोहित शर्मालाही एका क्रमांकाचा फायदा झाला आहे. ७३९ रेटिंगसह रोहित शर्मा दहाव्या स्थानावर पोहचला आहे. ऋषभ पंत कसोटी क्रमवारीत नवव्या स्थानावर आहे. तर गोलंदाजीत अश्विन याने अव्वल स्थान गाठलेय. ८६९ रेटिंगसह अश्विन कसोटीत अव्वल स्थानावर आहे. जेम्स अँडरसनला पछाडत अश्विनने पहिल्या स्थानावर कब्जा केला आहे. अष्टपैलू खेळाडूमध्ये रविंद्र जाडेजा पहिल्या स्थानावर आहे.

कोश्यारींच्या भूमिकेवर कोर्टाचे कडक ताशेरे, पदोपदी दिले 'फटके' शिंदे गटालाही बसले 'दणके'

सुराज्य/सोलापूर

राज्यातील सत्ता संघर्षावर सुप्रीम कोर्टात सुरू असलेली सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. बुधवारी झालेली सुनावणी लक्षवेधी ठरली. सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांनी माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी घेतलेल्या निर्णयावर कडक शब्दात ताशेरे ओढले. कोश्यारी यांनी कसे राजकारण खेळले? या प्रकारावर नेमके बोट ठेवत कोर्टाने प्रश्नांची सरबत्ती करून कोश्यारींचे वकील तुषार मेहता यांना अक्षरशः घाम फोडला. राज्यपालांनी आपले अधिकार काळजीपूर्वक वापरायला हवेत, अशा शब्दात न्या.चंद्रचूड यांनी कानपिचक्याही दिल्या. कोर्टाने या सुनावणीत जबरदस्त फटकारे लगावले. हे फटके म्हणजे जणू शिंदे गटाला दणके बसल्याचे मानले जात आहे.

बुधवारी कोश्यारी यांच्या वतीने मेहता यांनी बाजू मांडली. दरम्यान, यावेळी सरन्यायाधीशांनी कोश्यारी यांनी घेतलेल्या काही निर्णयांवर कडक शब्दात ताशेरे ओढले. बहुमत चाचणीसाठी आमदारांनी पत्र लिहिल्यानंतर तीन वर्ष तुम्ही सुखाने संसार केला आणि अचानक एका रात्रीत काय झाले की तुम्हाला(शिंदे गट) मतभेद असल्याचा साक्षात्कार कसा झाला? असा प्रश्न राज्यपालांनी त्या आमदारांना विचारायला हवा होता? तसेच राज्यपाल फक्त आमदारांच्या पत्राच्या आधारावर बहुमत चाचणीला सामोरे जा, असे म्हणू शकतात का? बहुमत चाचणी हीच मुळात सरकार पडण्यामध्ये परावर्तित होऊ शकते. राज्यपालांनी त्यांच्या कार्यालयाचे रुपांतर अशा प्रकारच्या कोणत्या निर्णयासाठी कारणीभूत ठरू देऊ नये. राज्यपालांना असे वाटले की- शिवसेनेतील एका गटाला पक्षाच्या आघाडीसोबत जाण्याच्या निर्णयावर विरोध आहे. मग फक्त त्या आधारावर राज्यपाल बहुमत चाचणीचे निर्देश देऊ शकतात का? मग एका अर्थाने ते पक्षच तोडत आहेत,असा गंभीर ठपका सरन्यायाधीशांनी ठेवला.

गेल्या महिन्याभरापासून सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सुनावणी सुरू आहे. या प्रकरणात राज्यपालदेखील प्रतिवादी असून त्यांच्या वतीने सॉलिसिटर जनरल मेहता बाजू मांडत आहेत. सुनावणीमधून अनेक मुद्दे चर्चेला येत आहे. सुनावणीदरम्यान, न्या. चंद्रचूड आणि खंडपीठातील इतर न्यायमूर्तींनी राज्यपालांच्या भूमिकेवर अनेक प्रश्न उपस्थित केले. न्या. चंद्रचूड यांनी राज्यपालांनी घेतलेल्या निर्णयांवर बोट ठेवत प्रश्नांची सरबत्तीच केली. राज्यपालांनी थेट बहुमत चाचणी करायला सांगणे, हे एकप्रकारेचे सरकार पाडण्याचे संकेत आहेत, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. ठाकरेंनी बहुमत गमावले आहे की नाही, हे राज्यपालांनी ठरवले नव्हते. त्यांनी फक्त बहुमत सिध्द करण्यासाठी सांगितले होते, असे मेहता म्हणाले. त्यावर सरन्यायाधीश म्हणाले, बहुमत सिध्द करायला सांगणे हे एक प्रकारे सरकार कोसळण्याचे संकेत आहे. राज्यपालांनी याचा भाग व्हायला नको. राज्यपालांनी केलेली ही बाब योग्य आहे का, असा सवाल त्यांनी केला.

राज्यपालांच्या अधिकारांबद्दल आम्ही बोलत आहोत, हे लोकशाहीसाठी खूप गंभीर आहे. अशा परिस्थितीत राज्यपालांनी दूर राहायला पाहिजे. कायदेशीररीत्या स्थापन झालेले सरकार सत्तेत आहे. राज्यपाल एखाद्या गृहीतकावर आधारीत निर्णय घेऊ शकत नाही. राज्यपालांना त्या ३४ आमदारांना शिवसेनेचे सदस्य म्हणूनच गृहीत धरावे लागेल. जर ते शिवसेनेचेच सदस्य आहेत. तर मग सभागृहात बहुमत सिध्द करण्याचा प्रश्न येतोच कुठे? असा प्रश्नही सरन्यायाधीशांनी विचारला.

आम्हाला काळजी वाटते : महाराष्ट्र हे एक राजकीयदृष्ट्या सुसंस्कृत राज्य आहे. अशा प्रकारच्या गोष्टींमुळे राज्याला कलंक लागत आहे. सर्वोच्च न्यायालय म्हणून आम्हाला या सर्व गोष्टींची काळजी वाटते. राज्यपालांनी दोन गोष्टी लक्षात घेतल्या नाहीत. एक तर काँग्रेस-राष्ट्रवादीमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद नव्हते. दोघांकडे मिळून ९७ आमदार आहेत. हाही फार मोठा गट होता. शिवसेनेच्या ५६पैकी ३४ आमदारांनी अविश्वास दर्शवला. त्यामुळे तीन पक्षांपैकी एका पक्षात मतभेद झाल्यानंतरही इतर दोन पक्ष आघाडीत कायम होते. या सगळ्या घडामोडी सरकार स्थापन झाल्यानंतर महिन्याभरात घडल्या नाहीत. हे सगळे तीन वर्षांनंतर घडत होते. त्यामुळे अचानक एक दिवस त्या ३४ जणांना वाटले की काँग्रेस-राष्ट्रवादीशी मतभेद आहेत, असे कसे? अशा शब्दात न्या.चंद्रचूड यांनी फिरकी घेतली.

लोकशाहीत असंतुलन : राज्यपालांच्या हस्तक्षेपामुळे लोकशाहीत असंतुलन निर्माण होईल. राज्यपालांनी आपले अधिकार खूप काळजीपूर्वक वापरले पाहिजे. जूनमध्ये पावसाळी अधिवेशन होते, त्यावेळी बहुमत चाचणी सांगायला हवी होती. सरन्यायाधीशांच्या या टिपण्णीवर मेहता म्हणाले, आमदारांना मिळालेल्या धमकीकडे राज्यपाल दुर्लक्ष करू शकत नाहीत. त्यावर पुन्हा सरन्यायाधीश म्हणाले, राज्यपालांनी सुरक्षेबद्दल यंत्रणांना पत्र लिहिले होते. ते त्यांचे काम होते. मात्र, या आधारावर सरकार पाडणे, हा राज्यपालांचा दृष्टिकोण योग्य नाही. यावर मेहता म्हणाले, अशा परिस्थितीत राज्यपाल शांत बसू शकत नाहीत. त्यावर पुन्हा सरन्यायाधीश म्हणाले, लोक पक्षातून बाहेर पडणे चालूच राहिले. राज्यपालांनी असाच पायंडा पाळला, तर ही चांगली बाब नाही. सभागृहामध्ये बहुमताला धक्का देण्यासारखे काहीही नसताना तुम्ही विश्वासदर्शक मत ठराव करा, अशी परवानगी कधीही देऊ शकत नाहीत, असेही सरन्यायाधीश म्हणाले.

लग्नाचे आमिष दाखवून विधवा महिलेस विष पाजले

सुराज्य/सोलापूर

लग्नाचे आमिष दाखवून पुणे येथील एका विधवा महिलेस सोलापुरात आणल्यानंतर तिला मारहाण करीत विष पाजल्याची घटना हिरज (ता. उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली.तिला बेशुध्द अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

ती ३० वर्षीय महिला (पिंपरी चिंचवड जि.पुणे) येथे राहण्यास होती. तिच्या पतीचे निधन झाले होते. त्यानंतर तिच्या परिचयातील सागर फंड (रा.हिरजगाव ता. उत्तर सोलापूर) याने तिला सहा महिन्यांपूर्वी तुझ्याशी लग्न करतो, असे म्हणत तिला आपल्या गावात आणले होते. त्यानंतर सायंकाळी सागर फंड आणि बापू भोसले या दोघांनी तिला मारहाण करीत बळजबरीने विष पाजले. तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून ती बेशुध्द आहे. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

बायकोला नांदायला का पाठवत नाही म्हणून मेव्हण्यावर चाकू हल्ला

मोहोळ : बायकोला नांदायला का पाठवत नाही म्हणून भाऊजीने मेव्हण्यावर चाकूने हल्ला केल्याने मेहुणा गंभीर जखमी झाला. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात भाऊजीवर गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना १४ मार्च च्या रात्री दहा वाजणे च्या सुमारास हॉटेल कल्याणी समोर कोकणे वस्ती कडे जाणाऱ्या रस्त्यालगत असणाऱ्या मैदानात घडली.

रेवणसिध्द गोकूळ होनमाने (रा. कुंभर खानी मोहोळ) हा गंभीर जखमी झाला. रेवणसिध्द होनमाने याची बहीण रेशमा हिचा विवाह मोहोळ येथेच चौमुखी मारुती चौकात राहणारे नितीन ब्रह्मदेव सोनटक्के याचेशी झाला. त्यांना दोन मुली व मुलगा आहे. ते शेळ्यांचा व्यवसाय करतात. नितीन सोनटक्के यास दारू पिण्याची सवय असून तो अधून मधून पत्नीशी भांडतो. चार-पाच दिवसापूर्वी पत्नी भावाकडे राहण्यास आली. रेवणसिध्द हा मिस्त्रीकाम करतो १४ मार्च रोजी रात्री सहा वाजता रेवणसिध्द कामावरून आल्यानंतर भाऊजी नितीन त्या ठिकाणी आला होता. तो रेशमा हीस घरी चल म्हणून गप्पा मारत बसला होता रात्री ९ वाजणेच्या सुमारास रेशमा कडून भाऊजी नितीन याने बहिणीकडून भाजी घेऊन येतो म्हणून ३०० रुपये घेतले माझ्या सोबत चल म्हणून रेवणसिध्द यास मोटर सायकल वर घेऊन गेला. संस्कार हॉटेलवरून २०० रुपयांची भाजी घेतली. कल्याणी हॉटेल वरून दारू पार्सल घेतली कोकणे वस्ती कडे जाणारे कच्च्या रस्त्यावर पटांगणात पिण्यासाठी बसले. नितीन याने नाकावर वार केला. त्यात गंभीर जखमी होऊन रक्त येऊ लागले रेवणसिध्द हा नितीनला ढकलून पळू लागला. तेव्हा नितीनने थांब थांब माझाकडून चूक झाली आपण दवाखान्यात जाऊ असे म्हणून गाडीवर बसवेल. दवाखान्यात न नेहता कोळेगाव पाटी येथे सैफन बाबा शेख याचे घरी घेऊन गेला. रेवणसिध्दने धोका ओळखून तेथून पळ काढला. हायवेला येऊन गाड्यांना हात करू लागला. लोक जमा झाले त्यांनी ॲम्बुलन्स बोलावली व मोहोळ येथे ग्रामीण रुग्णालयात पाठवले. मोहोळ पोलीस ठाण्यात रेवणसिध्द होनमाने याने फिर्याद दाखल केली त्यानुसार त्याचा भाऊजी नितीन सोनटक्केवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

उद्यान विभाग अधीक्षकपदी दिवाणजी

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या उद्यान विभागाच्या अधीक्षक पदाची जबाबदारी कनिष्ठ अभियंता असलेले विभागीय अधिकारी प्रकाश दिवाणजी यांच्याकडे अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला आहे तर सहाय्यक उद्यान अधीक्षक पदावर पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलंकर यांची नियुक्ती केली आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी तसे आदेश काढले आहेत.

उद्यान विभागात मानधनावरच सलग सेवा बजावत असलेल्या अधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखविल्यानंतर पालिका प्रशासनाने या विभागासाठी उद्यान अधीक्षक आणि सहाय्यक उद्यान अधीक्षक या पदासाठी मुलाखती घेऊन अधिकाऱ्यांची मानधनावर नेमणूक केली होती. मात्र यानंतर प्रथमच उद्यान विभागातील कामकाजासंदर्भात सततच्या तक्रारी प्रशासनाकडे येत होत्या. याकडे आयुक्तांनी अधिक लक्ष केंद्रित केले होते.

मानधनावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये खळबळ

गेल्या १२ वर्षांपासून महापालिकेच्या उद्यान विभागात मानधनावरच सलग सेवा बजावत असलेल्या अधिकाऱ्यांना आयुक्तांनी घरचा रस्ता दाखविला आहे. त्यांना पुन्हा मुदतवाढ दिली नाही. त्यामुळे मानधनावर काम करणाऱ्या विविध पदावरील अधिकाऱ्यांमध्ये मात्र एकच खळबळ उडाली आहे.

नियुक्त केलेल्या उद्यान अधीक्षक आणि सहाय्यक उद्यान अधीक्षक या मानधन पदावरील अधिकाऱ्यांची कराराप्रमाणे मुदत संपल्याने त्यांना मुदतवाढ न देता त्यांना घरचा रस्ता दाखविण्यात आला आहे. उद्यान विभागाच्या रिक्त असलेल्या अधीक्षक पदावर कनिष्ठ अभियंता तथा विभागीय कार्यालय क्रमांक ६ चे विभागीय अधिकारी प्रकाश दिवाणजी यांची नेमणूक केली. सहाय्यक उद्यान अधीक्षक पदी पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलंकर यांची नियुक्ती केली आहे.

एकीकडे मुलाचा दहावीचा पेपर तर दुसरीकडे वडिलांचा मृत्यू

भंडारा : अचानक प्रकृती बिघडल्यानं भास्कर तुपट यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. घरात वडिलांचा मृतदेह असताना मुलगा ओमकार याचा दहावीचा भूमिती विषयाचा पेपर होता. वडिलांच्या मृत्यूचं दुःख मनात असतानाही मन मोठं करून मुलगा ओमकार याला कुटुंबीयांनी धीर दिल्यानं दहावीचा पेपर दिला.

हा प्रकार भंडाऱ्यातील लाखांदूर तालुक्यातील कुडेगाव इथं घडला. दरम्यान असाच प्रकार ६ मार्चला सोनी इथं घडला होता. भंडाऱ्यातील लाखांदूर तालुक्यातील कुडेगाव येथील ओमकार तुपट हा लाखांदूर येथील शिवाजी विद्यालयात इयत्ता दहावीत शिकत आहे. बुधवारी सकाळी ११ वाजता त्याचा भूमिती विषयाचा पेपर होता. दरम्यान, ओमकारने वडील गेल्याने हंबरडा फोडला. याचवेळी कुटुंबियांनी ओमकारचा दहावीचा पेपर असल्याने वर्ष वाया जावू नये, म्हणून त्याला धीर देत परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित करत परीक्षा केंद्रावर पाठविले.

संपातील कर्मचाऱ्यांवर कारवाईला सुरुवात

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जुनी पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेऊन सुद्धा संपावर गेलेले कर्मचारी आपल्या भूमिकेवर कायम असल्यामुळे प्रशासनाने सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाईला सुरुवात केली आहे.

नुकत्याच नामांतर झालेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय यांनी जिल्ह्यात संपावर गेलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना नोटीस पाठवली आहे. या नोटीसीमध्ये संपावर गेलेल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कामावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यभरातील सरकारी कर्मचाऱ्यांनी जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी मंगळवारपासून (१४ मार्च) संप पुकारला आहे. या संपाला विरोधी पक्षांनी पाठिंबा देत राज्यसरकावर टीका केली आहे. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापना करत असल्याचे जाहीर करताना सरकारी कर्मचाऱ्यांना संप मागे घेण्याचे आवाहन केले होते.

मुख्यमंत्र्यांच्या आवाहनानंतरही सरकारी कर्मचाऱ्यांनी निर्णय होईपर्यंत संप चालूच ठेवणार असल्याच्या भूमिकेवर ठाम राहिले. त्यामुळे प्रशासनाने संप करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे.

सलग ५ पराभवानंतर अखेर आरसीबीचा विजय

मुंबई : महिला आयपीएल स्पर्धेत सलग पाच पराभवानंतर अखेर आरसीबीने विजयाचं खाते उघडले. आज झालेल्या सामन्यात आरसीबीने पाच विकेट्स आणि १२ चेंडू राखून युपीचा पराभव केला. एलिस पेरीच्या धारधार गोलंदाजीच्या बळावर आरसीबीने युपीला १३५ धावांवर रोखलं. त्यानंतर १८ व्या षटकात पाच विकेट्सच्या मोबदल्यात हे आव्हान पार केले. सलग पाच पराभव झाल्यामुळे आरसीबीचा संघाला सोशल मीडियावर ट्रोल करण्यात आले होते.

निसरा डोळा

– प्रकाश पोरे

तो परत आलाय...

कल्याण
157-30-145

मेन बाजार
249-58-134

भाजपा चले जाओ...

- मुंबईच्या महाविकासआघाडीच्या बैठकीत नारा
- राज्यातील सात ठिकाणी होणार शक्तीप्रदर्शन

सुराज्य/सोलापूर

स्वातंत्र्यपूर्व काळात ज्याप्रमाणे सर्वांनी एकत्र येत इंग्रजांना 'चले जाओ'चा नारा देत देशातून हद्दपार केले, त्यांच्या धर्तीवर देशातून भाजपाला हद्दपार करण्यासाठी भाजपा चले जाओचा नारा महाविकास आघाडीने दिला आहे. याचा श्रीगणेशा महाराष्ट्र राज्यातून करण्याचा संकल्प बुधवारी मुंबईत झालेल्या महाविकास आघाडीच्या संयुक्त बैठकीत करण्यात आला. यासाठी राज्यातील सात ठिकाणी महाविकास आघाडी मोठे शक्तिप्रदर्शन संयुक्त जाहीर सभा घेतल्या जाणार आहेत.

बुधवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात राज्यातील शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादीच्या प्रमुख पदाधिकारी आणि नेतेमंडळींची बैठक झाली. या बैठकीत राज्याचे माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री जितेंद्र आवाड, पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण, छगन भुजबळ, प्रणिती शिंदे चंद्रकांत खैरे यांच्यासह महाविकास आघाडीतील नेते मंडळी उपस्थित होते. या बैठकीस सोलापुरातून राष्ट्रवादीचे सोलापूरचे निरीक्षक शेखर माने, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भारत जाधव, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष काका साठे, विश्वनाथ चाकोते, प्रवक्ते मनोज कुलकर्णी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी राष्ट्रवादीच्या वतीने अजित पवार, जयंत पाटील काँग्रेसच्या वतीने नाना पटोले, बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण यांनी तर शिवसेनेच्या वतीने उध्दव ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. दोन पोट निवडणुका, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघात महाविकास आघाडीने एकत्र आल्यामुळे यश मिळाले. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा आणि लोकसभा निवडणुका महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढण्याचा संकल्प करत भाजपाला हद्दपार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी भाजप चले जाओचा नारा देखील देण्यात आला. त्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्रातून केली जाणार आहे. यासाठी राज्यात सात ठिकाणी मोठे शक्तिप्रदर्शन महाविकास आघाडीच्या वतीने जाहीर सभा घेऊन केले जाणार आहे.

अशी आहेत शक्तीप्रदर्शनाचे ठिकाणे : जबाबदारी

- २ एप्रिल रविवार छत्रपती संभाजी नगर (अंबादास दानवे)
- १६ एप्रिल रविवार नागपुर (सुनील केदार)
- १ मे सोमवार मुंबई (आदित्य ठाकरे)
- १४ मे रविवार पुणे (अजित पवार)
- २८ मे रविवार कोल्हापूर (सतेज उर्फ बंटी पाटील)
- ३ जून शनिवार नाशिक (छगन भुजबळ)
- ११ जून रविवार अमरावती (यशोमती ठाकूर)

जाहीर सभेची जबाबदारी पक्षाच्या नेत्यावर असेल. ती जाहीर सभा यशस्वी करण्यासाठी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी संयुक्त प्रयत्न करण्याचा संकल्प या बैठकीत केला असून २ एप्रिल रोजी होण्याऱ्या पहिल्या शक्ती प्रदर्शनासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी आतापासून कामाला लागण्याचा निर्णय घेण्यात आला.

२ एप्रिल रोजी संभाजीनगर येथून पहिल्या जाहीर सभेतून भाजपच्या विरोधात रणशिंग फुंकले जाणार आहे.